वयोवृद्धः मनोयुवा

**महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम), मुंबई**


संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./८४३/८/जीबीबीएसडी दि. २६/११/१९८१
मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नियम १९५० अन्वये नोंदणी क्रमांक : एफ-७५२८ (मुंबई) दि. २५/४/१९८२
कार्यालय पत्ता : ज्येष्ठ नागरिक भवन, सेक्टर १२, प्लॉट नं. ७ सी, गावदेवी मंदिरामागे, नेरूळ (प.), नवी मुंबई - ४०० ७०६.

# फेस्कॉमचे मुखपत्र : मनोहारी मनोयुवा

कार्यालय : अ/७, मिरज-मालगांव रस्ता, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.

वर्ष-३१ अंक-२ फेब्रुवारी २०२३

## राज्यव्यापी महिला मेळावा व मनोहारी मनोयुवा आनंद मेळावा निमित्त नांदेड येथील गुरुद्वाराच्या पावन भूमीत सर्वांचे स्वागत..!



तख्त श्री सचखंड हजूर साहिबा अबचलनगर
गुरुद्वारा, नांदेड

## जीवनगौरव



नुकताच बुलढाणा येथे आपले सहाध्यायी **श्री. प्रकाशजी पिंपरकर** यांचा ७५ वर्षपूर्तीचा भव्यदिव्य अमृतमहोत्सव सोहळा साजरा झाला. त्यांना एक चालते बोलते फेस्कॉमचे ऊर्जास्त्रोत म्हटले तर काही वावगे होणार नाही. अशा कर्तृत्वाच्या अनेक पायऱ्या ओलांडूनही ७५ व्या वर्षीही तोच जोश, तीच स्फूर्ती कायम आहे. कधीकधी असे वाटते फेस्कॉममध्ये तनमन अर्पून काम करणाऱ्या या ज्येष्ठांना इतकी ऊर्जा कशी....?



२५ डिसेंबरला झालेल्या या सोहळ्यास ज्येष्ठ नागरिकांसह परिसरातील अनेक ज्येष्ठ व श्रेष्ठ बहुसंख्येने उपस्थित होते. पश्चिम विदर्भ प्रादेशिक विभागातील बुलढाणा ज्येष्ठ नागरिक संघ, जिल्हा समन्वय समिती, अमरावती यांनी श्री.पिंपरकर यांच्या अथक सेवाभावी कार्याचा गौरव करीत त्यांना सन्मानपत्र प्रदान करुन श्री.पिंपरकर यांना सन्मानित केले.

**फेस्कॉम व फेस्कॉम मनोयुवा कौन्सिलच्या वतीने हार्दिक शुभेच्छा..!**

## आधारस्तंभ



**श्री. विनोद सराफ**

**पत्ता** : ६०१/३ब, अक्कोलड को-ऑप. हौसिंग सोसायटी, ग्रीन रोड, लुईसवाडी, मु.पो. ठाणे ४०० ६०४.

**जन्मतारीख** : २९/११/१९५७ **मोबाईल नं.** : ८६३८०५८२३९

**सेवा** : निवृत्त बँक अधिकारी

**सध्या** : सदस्य, लुईसवाडी ज्येष्ठ नागरिक संघ, ठाणे
प्रतिनिधी - एफ. डी. ए.

**कार्य** : ठाण्यात ५५२ ज्येष्ठ नागरिकांना मोबाईल/संगणक प्रशिक्षित केले. रश्मी ज्येष्ठ नागरिक संघाची वेबसाईट तयार केली. कोरोना काळात झूम ॲप द्वारा विविध कार्यक्रम (उदा. सभा, गेम्स, मनोरंजन) सादर केले. दवाखान्याबाबत विविध सेवा पुरविल्या.



राज्यस्तरीय महिला मेळावा आणि मनोहारी मनोयुवा आनंद मेळाव्याचे निमंत्रण मा. मुख्यमंत्री ना. एकनाथरावजी शिंदे यांना देताना फेस्कॉमचे उपाध्यक्ष आण्णासाहेब टेकाळे, अशोक तेरकर व जयवंत सोमवाड.

# राज्यस्तरीय महिला अधिवेशन आणि मनोहारी मनोयुवा आनंद मेळावा

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ (फेस्कॉम)चे वतीने राज्यस्तरीय ज्येष्ठ महिला अधिवेशन आणि मनोहारी मनोयुवा या मुखपत्राचा आनंद मेळावा नांदेड येथील मातोश्री मंगल कार्यालय, मोंढा सिडको रोड, कौढा येथे दि.१९ मार्च व दि.२० मार्च २०२३ रोजी घेणेचे ठरले आहे. अधिवेशन आणि आनंद मेळाव्याचे आयोजकत्व उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभागाने स्विकारली आहे. प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष श्री.अशोक तेरकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी कार्यक्रम यशस्वी करणेसाठी प्रयत्न सुरु केले आहेत.

सदरचा कार्यक्रम फेस्कॉमचा आहे. कार्यक्रम यशस्वी करणेची जबाबदारी केवळ उत्तर मराठवाडा विभागाची नसून सर्वच प्रादेशिक विभागांची आहे. १३ डिसेंबरच्या नियामक मंडळाचे सभेत याविषयी चर्चा/निर्णय झालेचे प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष आणि सचिव यांना ज्ञातच आहे. याविषयी सर्व प्रादेशिक विभाग अगर जिल्हा/ तालुका स्तरावर प्रचार व प्रसार करणे अपेक्षित होते. तरी सर्व प्रादेशिक विभागांनी राज्यव्यापी कार्यक्रमाची जिल्हा/तालुका स्तरावरील पदाधिकारी यांच्या सभा घेवून प्रचार व प्रसार करावा. जास्तीत जास्त महिलांकडून/ पदाधिकारी यांचेकडून आवश्यक ते शुल्क भरुन घेणेची आणि त्यांना उपस्थित ठेवणेची जबाबदारी प्रादेशिक विभागाची आहे. त्यांनी सदरचा कार्यक्रम फेस्कॉमचा म्हणजेच आपला आहे असे समजून कार्य करावे, ही विनंती.

कार्यक्रम प्रसंगी कोणत्या प्रादेशिक विभागाकडून शुल्क भरुन किती महिला पदाधिकारी/ सदस्या उपस्थित राहिल्या याचा उहापोह होणार असून सर्वाधिक महिलांना उपस्थित ठेवणाऱ्या प्रादेशिक विभागाचा विशेष गौरव केला जाणार आहे. (अट-किमान १०० महिलांची शुल्क भरुन उपस्थिती आवश्यक).

राज्यस्तरीय कार्यक्रमांबाबत, त्यामधील उपस्थिती शुल्क, पारितोषके, शुल्क भरणेसाठी बँकेचे नाव, खाते क्रमांक, स्पर्धा याबाबतची माहिती स्वतंत्र्यरित्या दिली आहे. सर्व प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष यांनी आपल्या प्रादेशिक विभागात जिल्हा/ तालुका स्तरावर सभा घेवून कार्यक्रमाची/ स्पर्धा/ पारितोषके इ. माहिती गावस्तरावरील ज्येष्ठ नागरिक संघापर्यंत पोहचवावी. ज्येष्ठ पुरुष नागरिकांनीही आवश्यक ते शुल्क करुन उपस्थित रहावे. सर्व प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष यांनी कार्यक्रमाचे भव्य-दिव्य यशस्वीतेसाठी खास प्रयत्न करावेत असे फेस्कॉमचे वतीने अध्यक्ष अरुण रोडे, उपाध्यक्ष आण्णासाहेब टेकाळे, उपाध्यक्ष विजय औंधे, उपाध्यक्ष व मनोयुवा कौन्सिलचे प्रमुख अंजुमन खान यांनी आवाहन केले आहे.

***

## पर्यटनासाठी वाहन व्यवस्था

दि. १९ व २० मार्च रोजीच्या राज्यस्तरीय कार्यक्रमास उपस्थित राहणाऱ्या प्रतिनिधींना प्रेक्षणीय स्थळांना भेट देणेची इच्छा असलेस माफक दरातील वाहनांच्या सोयीसाठी कृपया

**श्री. देवानंद स्वामी**

**(मो. ९९२२७८१२८८)**

यांचेशी संपर्क साधावा.

## - आवाहन -

## ✻ सांस्कृतिक कार्यक्रम ✻

१) फेस्कॉमच्या १२ प्रादेशिक विभागातील सध्याचे सभासद असणाऱ्या पुरुष आणि महिलांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेता येईल. सहभागी पुरुष अगर महिलांना व्यक्तिशः अगर समुहाद्वारे कार्यक्रम सादर करावयाचा असेल तर प्रत्येक कार्यक्रमासाठी रु.१००/- (रुपये शंभर मात्र) प्रवेश शुल्क आहे.

२) प्रत्येक प्रादेशिक विभागाला फक्त १० मिनिटे वेळ देणेत येणार असून वैयक्तिक अगर सामुदायिक सर्व कार्यक्रम प्रादेशिक विभागाने विहित वेळेतच पूर्ण करावयाचे आहेत.

३) प्रादेशिक विभागाने सहभागी कलाकार अगर समुहाकडून प्रवेश शुल्क स्विकारुन अधिवेशन खात्यावर बँकेत जमा करणेचे आहेत.

४) प्रादेशिक विभागाने कार्यक्रमाची माहिती (कार्यक्रमाचे स्वरुप आणि वेळ) दिनांक २८ फेब्रुवारी २०२३ पर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम प्रमुख श्रीमती विजया विष्णुपुरीकर (मोबा.क्र. ७९७२८६९५६५) यांना कळवावी. वेळेचा विचार करता ऐनवेळी कोणत्याही कार्यक्रमास परवानगी देणे शक्य होणार नाही.

| अशोक तेरकर | प्राचार्य डॉ.मे.सौ.निर्मला कोरे | डॉ.सौ.ज्योती डोईफोडे | नारायण वाढोणकर |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | सचिव | उपाध्यक्ष | कोषाध्यक्ष |

सुकाणु समिती

## अभ्यास-शासन परिपत्रके

फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल

फेस्कॉम चळवळीतील प्रत्येक पदाधिकारी शासकीय निर्णय व विविध परिपत्रके यामध्ये सर्वगुण संपन्न असावा असा फेस्कॉम प्रयत्न करीत आहे. ऑगस्ट २०२२ पासून विविध पदाधिकारी यांचे दरमहा प्रशिक्षण शिबिरे घेतली आहेत. याबाबतचा उहापोह माहे जानेवारी २०२३च्या अंकात केला आहे.

या अंकात जागेअभावी काही उपयुक्त परिपत्रके आपणासर्वांसमोर ठेवणे शक्य झाले नाही. आता दि.२८/०१/२०१३, दि.१०/०९/२०१८, दि.०१/११/२०१८ आणि दि.२७/०८/२०१७ ची उपयुक्त परिपत्रके सर्वांचे माहितीसाठी दिलेली आहेत. याचाही अभ्यास करुन याचा प्रचार व प्रसार ग्रामीण भागातील ज्येष्ठ नागरिकांपर्यंत करावा असे आवाहन करणेत येत आहे.

# फेस्कॉमची भावी वाटचाल

श्री. अरुण रोडे
फेस्कॉम अध्यक्ष

दि. १२ डिसेंबर १९८० रोजीला स्थापन झालेल्या आपल्या फेस्कॉम संघटनेला दि.१२ डिसेंबर २०२२ रोजीला ४२ वर्षे पूर्ण होऊन ४३व्या वर्षात आपण पदार्पण केलेले आहे.

डॉक्टर राधाकृष्ण भट यांनी लावलेल्या रोपट्याला आता बऱ्याच फांद्या फुटून त्याचा वटवृक्ष झाला आहे. फेस्कॉम आपल्या १२ प्रादेशिक विभागांचेमार्फत महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यात, ३५८ तालुक्यातील ज्येष्ठांच्यासाठी कार्य करत आहे. गेल्या ४२ वर्षात आपण फक्त ४७०० संघ निर्माण करु शकलो आहोत व त्या संघाचे ५ ते ६ लाख सभासद फेस्कॉमच्या चर्चाछत्राखाली आलेले आहेत.

त्यातले किती संघ व त्यांचे सभासद हे कृतीशिल आहेत ही तर विचार करायला लावणारी बाब आहे. आपण सर्व फेस्कॉमचे पदाधिकारी स्टेजवर आपल्या जोशपूर्ण भाषणात महाराष्ट्राची लोकसंख्या १३ कोटी ५० लाख व त्यात ज्येष्ठांची संख्या १ कोटी ३६ लाख आहे हे आवर्जुन सांगत असतो. मग या १ कोटी ३६ लाख पैकी आपण आतापर्यंत फक्त ५ ते ६ लाख ज्येष्ठांपर्यंत पोहोचलो व तेही सर्व क्रियाशील आहेत असेही नाही.

यासाठी ज्येष्ठ नागरिक संघ वाढविणे, सभासद वाढविणे, जे संघ व सभासद क्रियाशील नाहीत ते क्रियाशील करणे ही काळाची गरज आहे व त्यासाठी प्रथम फेस्कॉमचे पदाधिकारी हे सक्षम करणे आवश्यक आहे. यासाठी आपण ऑगस्ट २०२२ पासून आपल्या हक्काच्या जागेत, ज्येष्ठ नागरिक भवन नेरुळ मुंबई, येथे पदाधिकारी प्रशिक्षण वर्ग घेतले आहेत. प्रथम फेस्कॉमच्या प्रादेशिक विभागाचे अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष यांचे प्रशिक्षण वर्ग घेतले व एकसमान लेखापध्दती व प्रशासकीय कामकाजाबाबत तसेच फेस्कॉमच्या उद्दीष्टांवर आधारित उपक्रम व कार्यक्रम हाती घेणेबाबत माहिती दिली. केंद्राचे व राज्याचे ज्येष्ठ नागरिक धोरण, आर्थिक लाभाच्या योजना, ज्येष्ठांना उपयुक्त कायदे, यावर प्रशिक्षणात माहिती दिली.

त्यानंतर फेस्कॉम प्रादेशिक विभागाचे उपाध्यक्ष, सहसचिव, संघटक व संपर्क सचिव यांचे निवासी वर्ग घेतले. दोन प्रशिक्षण वर्ग हे केवळ समन्वय समितीच्या अध्यक्ष व सचिव यांचे घेतले. दि.२२, २३ व २४ डिसेंबरला महिला पदाधिकारी यांचे प्रशिक्षण वर्ग घेणेत आले. हे सत्र अव्याहत चालूच राहणार आहे.

पण याचे फलित काय?

फेस्कॉमचे संघ, सभासद वाढ प्रत्यक्षात दिसते कां? निष्क्रिय संघ, सभासद व फेस्कॉमचे पदाधिकारी सक्रिय झालेत का? याबाबत परत चिंतन करण्याची वेळ आली आहे.

महिलांचे संघ ५९०च्या आसपास आहेत ते दि.३१ मार्च २०२३ अखेर किमान ७०० झाले पाहिजेत. तर एकूण संघ किमान ७००० पर्यंत झाले पाहिजेत व ते ही सध्याचे संघ सक्रिय करुन यासाठी सर्व प्रादेशिक विभागांना नियामक मंडळ सभेत उद्दिष्ट ठरवून दिले आहे त्याप्रमाणे सर्व पदाधिकारी यांनी या ४२व्या वर्धापनदिनाच्या निमित्ताने संकल्प करुन, कार्यवाही सुरु करावी. यामध्ये समन्वय समितीची भूमिका महत्त्वाची आहे.

आता आपण फेस्कॉमच्या इतिहास लेखनाचे काम हाती घेतले आहे. नांदेडच्या डॉक्टर ज्योतीताई कदम हा इतिहास लिहित आहेत.

मनोहारी मनोयुवा हे आपले मुखपत्र सन १९९३ पासून चालू आहे. त्याचे वर्गणीदार व

आधारस्तंभ वाढविणेसाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करायला हवेत. यामध्ये प्रादेशिक विभागाच्या अध्यक्षांचे प्रयत्न वाढणे आवश्यक आहे.

खऱ्या अर्थाने आता फेस्कॉमच्या उद्दिष्ट्याप्रमाणे जे ज्येष्ठ नागरिक बेघर, अत्याचारीत, पिडीत, वंचित, शोषित आणि निराधार आहेत, त्यांना शासनाच्या आर्थिक लाभाच्या योजनांचा लाभ मिळवून देणे, कायदे विषयक सल्ला देणे, नॅशनल हेल्पलाईन १४५६७ ची माहिती देणे हे पदाधिकाऱ्यांचे आद्य कर्तव्य आहे.

प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी असलेल्या ''ज्येष्ठ नागरिक समन्वय व सनियंत्रित समितीमध्ये फेस्कॉम''च्या प्रतिनिधींनी आवाज उठवावा व जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न समजावून घेऊन ते सोडविण्यासाठी प्रयत्न करावेत. महाराष्ट्रातील विद्यापिठात ''ज्येष्ठ नागरिक सहाय्यता कक्ष'' सर्वत्र स्थापन झाले पाहिजेत.

फेस्कॉम पदाधिकारी यांनी हे सर्व कार्य तन-मन-धनाने केले तरच या वर्धापनदिनाच्या निमित्ताचे सार्थक होईल. कोरोना काळात आपण ''फेस्कॉम डिजिटल ॲकेडमीची'' स्थापना केली, लॉकडाऊन काळात ४००चेवर वेबिनार ऑनलाईन कार्यक्रम पूर्ण केलेत, फेस्कॉम पदाधिकारी व सभासद यांना डिजिटल साक्षर करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. डॉक्टर राधाकृष्ण भट, डॉक्टर एस.पी. किंजवडेकर, रमणभाई शहा, मधुकर कुलकर्णी, अनंतराव घोलप यांनी या पायवाटेचा समृध्द राजमार्ग तयार करुन आपणांस दिला आहे. त्याचे स्मरण ठेऊन पुढील वाटचाल दमदारपणे चालू ठेऊया.

ज्येष्ठ शक्तीचा विजय असो !!

नारी शक्तीचा विजय असो !!

* * *

## चला नांदेडला !

**महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ(फेस्कॉम)चे पाचवे ज्येष्ठ नागरिक राज्यस्थरीय महिला अधिवेशन.**

**१९ मार्च व २० मार्च २०२३ नांदेड, मराठवाडा.**

**स्थान महात्म्य :** मराठवाडा, संतांच्या वास्तव्याने पावन झालेला प्रदेश. ज्ञानेश्वर मराठवाड्याच्या सीमेवरचे, गोदावरी नदीच्या एका तीरावर संत एकनाथ महाराजांचे पैठण, तर पलीकडच्या तीरावर ज्ञानेश्वरांचे आजोळ आपेगाव आहे. औंढ्या नागनाथ जवळ नर्सी बामणी नावाचे गाव आहे. नामदेव महाराजांच घराण तिथले. जनाबाई गंगाखेडची. समर्थ रामदास जामचे. औरंगाबाद जिल्ह्यातल्या परतूड तालूक्यात जाम हे गाव आहे. महानुभाव पंथामध्ये प्रतिकालिदास म्हणून ओळखला जाणारा भास्करभट्ट बोरीकर हा कासारबोरीचा, नरेंद्र पंडित देवगिरीचा.

हजूर साहेब सचखंड (सत्याची भूमी) गुरूद्वार नांदेड. सिखांच्या पाच तख्तांपैकी एक. महाराजा रणजीत सिंह यांनी गुरु गोविंद सिंह यांच्या स्मृतीस्थळी हे गुरुद्वार बांधून घेतले. (१८३२-१८३८) जगप्रसिध्द श्रध्दास्थान. लाखो श्रध्दाळू येथे येत असतात. गुरु गोविंद सिंह (२२ डिसेंबर १६६६-७ ऑक्टोबर १७०८) सिख पंथाचे १० वे गुरु, महान योध्दा चिंतक, कवि. त्यांना 'संत सिपाही' म्हटलं जातं. त्यांनी गुरु ग्रंथसाहेब पूर्ण केले. खालसा पंथाची स्थापना केली. लढवय्यांची फौज तयार करून जुलमी सत्तेशी सामना केला. मानवी गुरु परंपरा त्यानी बंद करून गुरुग्रंथसाहेब गुरुस्थानी प्रतिष्ठीत केला.

**प्रेषक : श्या.गो.पाटील**

सौ. सुजाता अशोक कानेटकर
सातारा

## महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ फेस्कॉम आयोजित महिला पदाधिकारी प्रशिक्षण

महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक महासंघ फेस्कॉम विद्यमाने दि.२३ व दि.२४ डिसेंबर रोजी फेस्कॉम महिला पदाधिकारी यांचे निवासी प्रशिक्षण, नेरुळ, मुंबई येथे आयोजित केले होते. सदर प्रशिक्षणासाठी फेस्कॉमचे पदाधिकारी आणि महिला प्रशिक्षणार्थी दि.२२ डिसेंबर रोजीच महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यातून उपस्थित झाल्या. नेरुळ येथील ज्येष्ठ नागरिक पदाधिकाऱ्यांनी महिलांची निवास व्यवस्था उत्तम केली आहे.

दि. २३ डिसेंबर रोजी सकाळी सात वाजता निवासजागीच चहा उपलब्ध होता. सकाळी ८:३० ते ९:३० वा. पर्यंत नाश्ता मिळाला. त्यानंतर प्रशिक्षणार्थींची नोंदणी करुन प्रशिक्षणकीट वाटप करण्यात आले. आवश्यक पुस्तके, लेखनसाहित्य असे कीटचे स्वरुप होते. बरोबर १०:०० वाजता भवनमधील सुशोभित अशा गणेश सभागृहात महिला प्रतिनिधी उपस्थित झाल्या. दीपप्रज्वलनाने प्रशिक्षणाची सुरुवात झाली. मा.अरुण रोडे, मा.डॉ.मायाताई कुलकर्णी, मा.आण्णासाहेब टेकाळे, मा.विवेक देशपांडे, मा.नानासाो इंगळे, मा.चंद्रकांत महामुनी आदी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. सानेगुरुजींची फेस्कॉम मान्य प्रार्थना ‘खरा तो एकचि धर्म’ आणि स्वागतगीत सादर केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक फेस्कॉमच्या महिला समितीच्या अध्यक्षा मा.डॉ.मायाताई कुलकर्णी यांनी केले. संघाची व्याप्ती, संघाचा इतिहास, संघाची गरज, संघाची कार्यपध्दती याबाबत प्रशिक्षार्थींना संबोधित केले. २०२५ पर्यंत १००० महिला संघ स्थापन करण्याबाबत महिलांना प्रवृत्त केले. संघातून कोणकोणते उपक्रम अपेक्षित आहेत याचे मार्गदर्शन केले. संघशक्तीची वाढ करण्यासाठी महिलांना जागृत केले.

त्यानंतर सर्व पदाधिकारी महिला प्रतिनिधींना आपला परिचय थोडक्यात करुन दिला. मा.नानासाो इंगळे यांनी ज्येष्ठ नागरिकांसाठीच्या कायद्यांची अंमलबजावणी महत्त्वाची असल्याचे मत व्यक्त केले. जिल्हा समन्वय समितीमार्फत पाठपुरावा करावा लागेल अशी कल्पना त्यांनी मांडली.

केंद्र आणि राज्य सरकारचे ज्येष्ठांसाठीचे धोरण या विषयावर मा.सुनंदा हरणे, नागपूर यांनी मार्गदर्शन केले. फेस्कॉमकडून प्रशिक्षणार्थींसाठी या विषयाच्या पुस्तिका पुरविण्यात आल्या.

सौ.मालती डुंबरे, ओतूर यांनी महाराष्ट्र शासनाच्या ज्येष्ठांसाठीच्या आर्थिक योजना सांगितल्या दरम्यान मा.रोडे साहेबांनी काही योजना फसव्या असल्याचे पटवून दिले. त्यासाठी संघटितपणे पाठपुरावा करण्याचे आवाहन केले.

मा. आण्णासाो टेकाळे यांनी रेल्वे सवलत, एस.टी. सवलत, श्रावणबाळ योजनासाठींचे फेस्कॉमचे योगदान विशद केले.

मा. सीमा आगवणे यांनी फेस्कॉममधील महिला ज्येष्ठ नागरिक संघ, महिला पदाधिकारी व सभासद यांचे संघटनेतील योगदान याबाबत मार्गदर्शन केले. प्रबोधनकामात सर्वांना सहभाग करुन घ्यावे, आरोग्यविषयक मार्गदर्शन व चर्चासत्रे आयोजित करावी, महिलांना स्वावलंबी बनविण्याचा प्रयत्न करावा, वर्षांतून दोन सहली काढाव्यात, ग्रंथालय उपलब्ध करुन द्यावे, वर्तमानपत्रातील घडामोडीवर चर्चा करावी, वृक्षारोपण करावे, वृक्षसंवर्धन करावे इ. उपक्रम सुचविले.

मा.मायाताईंनी ‘गाव तेथे संघ’ काढावे, वृध्दांवरील अत्याचार एकजुटीने कमी करण्याचा प्रयत्न करुया असे मत मांडले. मा.रोडेसाहेबांनी हेल्पलाईन नंबर, ज्येष्ठांसंबंधीचे सरकारचे अखर्चिक धोरण सांगत, दबावगट निर्माण करण्याची गरज स्पष्ट केली.

दुसऱ्या सत्रात मा.आसावरी फडणीस यांनी

ज्येष्ठांसाठीचे उपयुक्त कायदे २००५ चा महिलांवरील कौटुंबिक अत्याचार विरोधी कायदा व २००६ आईवडिल व ज्येष्ठ नागरिक चरितार्थ व कल्याण कायदा २००७ व त्यांचे नियम २०१० याबाबत अतिशय वस्तुनिष्ठ उदाहरणे देवून मार्गदर्शन केले. अतिशय किचकट, भावनिक गुंतागुंतीचा विषय असूनही त्यांनी विषय छान समजावून दिला.

मा.डॉ.मायाताईंनी महिलांचे आरोग्याबाबत मार्गदर्शन केले. शारिरीक, मानसिक आणि भावनिक आरोग्य जपण्याची गुरुकिल्ली 'मैत्री' असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दिवसभर बोधामृत आणि ज्ञानामृतात आकंठ गुंतलेल्या प्रशिक्षणार्थींना मा.मीराताई कुलकर्णी यांनी हास्ययोगाचं प्रात्यक्षिक दाखविले, काही उपक्रम सर्वांकडून करुन घेतले. महिला प्रतिनिधी उत्साहित झाल्या. ताणतणाव नष्ट करण्यासाठी हास्य परिणामकारकपणे काम करते, खळखळून हसले पाहिजे असे सांगत त्यांनी सारे सभागृह हास्यकल्लोळात दुमदुमवून टाकले.

त्यानंतर हौशी महिलांनी उखाणे घेतले प्राची करमरकर यांनी पसायदान म्हटले आणि प्रथम दिवसाच्या प्रशिक्षणाचा समारोप झाला.

मा. मंदा अष्टेकर यांनी पहिल्या दिवसाच्या सर्व कार्यक्रमाचे सुत्रसंचालन केले.

**दुसरा दिवस**

दि. २४ डिसेंबर २०२२, प्रशिक्षणाचा दुसरा दिवस. चहा-नाश्ता झाल्यावर नियोजनाप्रमाणे सकाळी १०:००वा. सर्व महिला प्रतिनिधी गणेश सभागृहात उपस्थित झाल्या. आज आपण काय ऐकलं यावर आधारित गटचर्चा हा विषय महत्त्वाचा असल्याचे मा.रोडे साहेबांनी सांगितले. त्यापूर्वी डॉ.विनिता केळकर आणि डॉ.स्वाती फडके यांचे 'डिजिटल साक्षरता' संदर्भात मार्गदर्शन झाले. अतिशय सोप्या पध्दतीने या अत्यावश्यक विषयाबाबत दोघींनी उत्तम मार्गदर्शन केले. त्याची गरज आणि फायदे भगिनींना पटवून दिले. काळाबरोबर चालण्याची गरज असल्याचे सांगितले. तसेच 'असावा ज्येष्ठ, डिजिटली श्रेष्ठ' हे ब्रिदवाक्य सांगितले. अनेकांच्या मनातील मोबाईल चार्जिंगबाबत असलेल्या चुकीच्या कल्पनांचे निराकरण केले. शेवटी दोघींचे या विषयाबाबत मजेशीर सवाल जवाबही झाले.

त्यानंतर डॉ.मेजर निर्मला कोरे, नांदेड यांनी नांदेड येथे होणाऱ्या पाचव्या महिला अधिवेशनाची माहिती दिली. महिलांनी बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आवाहन केले.

मा. रोडे साहेबांनी गटचर्चेचे नियोजन केले.

गट क्र.१ उत्तर मराठवाडा- पूर्व विदर्भ- कोल्हापूर यांच्यासाठी विषय फेस्कॉम संघटनेतील महिलांचे योगदान.

गट क्र.२ कोकण- पुणे- विषय महिला संघ वाढविणे, संघातील महिला सभासद व पदाधिकारी सक्रिय करणे, कुटुंबात व समाजात महिलांना सन्मान मिळवून देण्यासाठी उपक्रम सुचविणे.

गट क्र.३ मुंबई, नगर नाशिक, दक्षिण मराठवाडा व सांगली. विषय- महिलांचे आरोग्य, महिलांच्या अंगीकृत कलागुणांना प्रोत्साहित करण्यासाठी उपक्रम असे विषय दिले गेले.

जेणेकरुन दोन दिवस नेमके काय मिळाले याचा आढावा फेस्कॉमला मिळेल. भोजनोत्तर गटप्रमुखांनी गटचर्चेचे सादरीकरण केले.

गट क्र.१ चे सादरीकरण डॉ.देशमुख यांनी अत्यंत प्रभावीपणे, सर्व समावेशकरित्या केले. कोणाचेही नाव न घेता सर्वांना सन्मान दिला. वृध्दाश्रमापेक्षा घरातच ज्येष्ठांना सांभाळा असा मोलाचा विचार मांडला.

गट क्र.२ चे सादरीकरण डॉ.कुंदाताईंनी केले.

गट क्र.३ चे सादरीकरण मोहिनी माने यांनी केले.

सर्वांनी विषयाला योग्य न्याय देवून चर्चा केल्याचे मत मा.रोडे साहेबांनी व्यक्त केले. मा.डॉ.मायाताईंनी समारोपाचे भाषण केले. "निरपेक्ष सेवा हाच परमार्थ आहे, सुसंवाद ठेवा, महिलाशक्ती मोठी आहे, सन्मान मागू मिळत नाही तो मिळवावा

लागतो, तुम्ही साऱ्याच ग्रेट आहात.'' असे सांगून महिलांना प्रोत्साहित केले.

दुसऱ्या दिवसाचे सूत्रसंचालन मा.मंदा अष्टेकर, सातारा यांनी केले.

**

**अभिप्राय**

फेस्कॉमने आयोजित केलेल्या महिला पदाधिकारी प्रशिक्षणामुळे खूप काही मिळाले. नेरुळ येथील ज्येष्ठ नागरिक भवन दोन दिवस आमचे माहेरच बनले होते. भवन सुशोभित असल्याने माहेरीच्या कार्यासाठी आल्यासारखे वाटत होते. स्वागताला आमचे दादा-भाऊ-ताई उपस्थित होते.

निवासी प्रशिक्षण घरापासून लांब, थोडी काळजी होतीच पण पोहोचल्यावर घरच विसरलो. हॉलमध्ये गाद्या टाकून व्यवस्था होती. बेड नाही याची आठवणही झाली नाही. पंचवीस- तीसजणी निर्धास्तपणे आडव्या होत होतो. आंघोळीला गरम पाणी पण प्यायलाही गरम पाणीची व्यवस्था होती. झोपून उठल्या उठल्या चहा हजर असायचा. ज्येष्ठ महिलांना पचेल,चालेल असा नाश्ता व भोजनाची व्यवस्था होती. आम्हा सर्वांची मा. मायाताई दादा-भाऊंच्या बरोबरीचे आम्हाला सांभाळत होत्या.

दोन दिवसात खूप काही मिळाले. महाराष्ट्रातील झाकली माणकं पाहता आली. महिलांच्या आतील स्फुलिंग प्रज्वलित झालं. खूप साऱ्या मैत्रीणी मिळाल्या. खूप साऱ्यांचे खरं वय, खोटं वय कामातून कळालं. ज्ञान तर मिळालंच पण प्रेम, माया, कौतुक भरभरुन मिळालं. महिला शक्तीचा जागर फेस्कॉमच्या माध्यमातून देशभरात होऊ दे हीच सदिच्छा !

***

फेस्कॉम प्रादेशिक विभाग विदर्भ (पश्चिम) चे अध्यक्ष श्री.प्रकाशराव प्रल्हादराव पिंपरकर यांच्या अमृतमहोत्सव कार्यक्रमप्रसंगी नांदेडचे श्री.गणेश मोहरीर यांनी रचलेले गीत.

वरिष्ठांत तो वरिष्ठ ।
ज्येष्ठांत तो ज्येष्ठ ।
ज्येष्ठही मानिति ज्या श्रेष्ठ ।
पिंपरकर नाम तयाचे ।।१।।

जिथे असे अंधार ।
तिथे 'प्रकाशच' आधार ।
बोलती साधार ।
सकळजन कौतुके ।।२।।

सोडविण्या प्रश्न भाकरीचा ।
मार्ग अनु सरला चाकरीचा ।
तोडून बंद साखळीचा ।
सुखे सेवामुक्त जाहला ।।३।।

सेवामुक्त झाली जरी ।
तरी स्वस्थ न बसे घरी ।
ज्येष्ठांची चिंता वाहि उरी ।
मानोनी दायित्व आपुले ।।४।।


आपुले ते आपले ।
इतरे जना केले आपुले ।
चिंतेने त्यांच्या व्यापिले ।
अंतःकरण तयाचे ।।५।।


वृक्ष विशाल विस्तीर्ण ।
टवटवीत त्याचे पर्ण ।
घेऊनी कवेत सर्व ।
भार वाही सकळांचा ।।६।।

येता समीप अमृत क्षण ।
सरसावले सकळजन ।
करिती अभिष्ट चिंतन ।
उस्फूर्तपणे ।।७।।

* * *





क्रांतिसिंह ज्येष्ठ नागरिक संघ, विश्रामबाग (सांगली) मधील कलाकार ज्येष्ठ नागरिक यांचे मनोरंजन करताना



राजर्षी ज्येष्ठ नागरिक संघ कोल्हापूर चे वतीने
जलद चालणेच्या
स्पर्धे प्रसंगी उपस्थित ज्येष्ठ महिला स्पर्धक.




राजर्षी ज्येष्ठ नागरिक संघ कोल्हापूर चे वतीने
जलद चालण्याच्या स्पर्धेत यशस्वी महिला
स्पर्धकाना बक्षीस वाटप प्रसंगीचा फोटो.



जयसिंगपूर मधील लक्ष्मीबाई पाटील महिला
ज्येष्ठ नागरिक संघातील महिला संक्रातीनिमित्त
आयोजित कार्यक्रम प्रसंगी.



कोल्हापूर येथील शाहूपुरी ठाण्यात कार्यक्रमाप्रसंगी
पोलीस निरीक्षक राजेश गवळी यांचा सत्कार करतांना
राजर्षी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष घोलराखेसाहेब,
सोबत सुशिला ओडेयर व इतर

Periodical Registered with Registrar of Newspaper for India (RNI) No. MAHMAR/2003/10732



ऐरोली येथील सिनियर सिटीजन हेल्थ केअर फाऊंडेशन चे वतीने योगा शिबिर प्रसंगी




ज्येष्ठ नागरिक संघ एम.आय.डी.सी.डोंबिवली मध्ये भगवद्गीतेतील सहाव्या अध्यायाचे निरूपण करतांना गीताव्रती प्रतिभाताई बिवलकर.



राज्याचे माजी महसूलमंत्री एकनाथराव खडसे यांच्या हस्ते डॉ. एस. आर. पाटील यांना 'लोकमत गौरव कर्तृत्वाचा' या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.




श्री. प्रकाश पिंपरकर यांच्या ७५ वर्ष अमृत महोत्सवी वर्षपूर्ती निमित्त आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यातील उपस्थित मान्यवर




ज्येष्ठ नागरिक संघ, बेस्टनगर, गोरेगांव (मुंबई) यांचे रौप्य महोत्सवी सोहळ्यात मार्गदर्शन करताना फेस्कॉमचे अध्यक्ष श्री. अरुण रोडे

Postal Licence Registratio
SGL/133/2021-2023

कृपया अंक पत्त्यावर द्यावा. वितरीत न झालेस सकारण परत करावा.
अपूर्ण पत्ता ☐ /मयत ☐ /पत्ता सोडून गेले ☐ /पोस्टमन बीट क्र. ☐

प्रेषक :

**श्री. अंजुमन खान**
फेस्कॉम उपाध्यक्ष व प्रमुख, फेस्कॉम मनोयुवा कौन्सिल
अ/७, सुभाषनगर, ता. मिरज, जि. सांगली - ४१६ ४३७.
मोबा. ९४२२५८३००४

**PRINTED MATTER**

प्रति,

_______________

_______________

_______________